महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.२-ब/ १३५८०.
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

दिनांक : १५.०५.२०१२.

# परिपत्रक

विषय :- म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियम क्र. ११ (ग) नुसार कंपनीतील कर्मचाऱ्यांना स्थायीकरण (Confirmation) करणेबाबत.

.....

असे निदर्शनास आले आहे की, मुख्य कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालयांकडून बऱ्याच परिमंडळ/मंडल/विभागीय कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीचे व पदोन्नतीचे आदेश जारी केले जातात. तथापि, त्यांचा परिवीक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्यावरही म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियम क्र.११ (ग) मधील तरतुदीनुसार सदर कर्मचाऱ्यांना स्थायीकरण (Confirmation) करण्याबाबत कार्यवाही केली जात नाही. याबाबत पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. सरळ सेवेद्वारे/विभागीय पदोन्नतीद्वारे महावितरण कंपनीच्या सेवेमध्ये रुजू झालेल्या पदावर, सदर कर्मचाऱ्यांनी एक वर्षाचा परिवीक्षा कालावधी पूर्ण करताच (त्यांचे नियंत्रण अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांची कार्यशैली अथवा वर्तणुकीबाबत प्रतिकूल शेरे सक्षम अधिकारी यांना अवगत केले नसल्याच्या अधीन राहून) त्या कर्मचाऱ्यांना त्यांनी धारण केलेल्या पदावर नियुक्ती अधिकारी कायम करतील व तशी नोंद संबंधित कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकामध्ये तसेच एच.आर.एम.एस.प्रणालीमध्ये न चुकता करण्यात येईल.

३. भटक्या-विमुक्त जाती/जमाती व विशेष मागासप्रवर्ग या संवर्गामधील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र. ८४५२/०४ प्रलंबित आहे. त्यामुळे भटक्या-विमुक्त जाती/जमाती व विशेष मागासप्रवर्ग यातून सरळ सेवेद्वारे नियुक्त झालेल्या किंवा पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना मात्र सदर याचिकेच्या निर्णयापर्यंत त्यांनी धारण केलेल्या पदावर स्थायीकरण करण्यात येऊ नये.

४. सदर सूचनांचे पालन काटेकोरपणे करावे.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(संदेश ए. हाके)*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

D:\O&M\Circular - F.N.2-B-Confirmation.doc
03/05/2012